# SCHOLARS IMPACT

Quarterly

An International Multidisciplinary Multilingual Peer Reviewed Research Journal

ISSN 2394 - 7632
EISSN 2394 - 7640

Special Issue

Approved By UGC Journal No- 41129

IMPACT FACTOR - 5.98


10-19

UGC (CPE) S...

...ed, Peer Reviewed,

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM : CHALLENGES AND OPPORTUNITIES"

म.शि.प्र. मंडळाचे श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी

16th February 2019


Volume-II, February 2019 (Special Issue)


ज्ञान-विज्ञान विमुक्तये
University Grants Commission

Feb 2019 5


✤ EDITOR IN CHIEF ✤

DR. M. RAGHIB DESHMUKH

✤ GUEST EDITOR ✤

DR. BALASAHEB JADHAV


www.scholarsimpact.com

: Organised by :

## Department of Political Science

M.S.P. Mandal's

## SHRI SHIVAJI COLLEGE, PARBHANI.

UGC - College with Potential for Excellence NAAC Accrediated A+Grade (Third Cycle)

(Affiliated to : Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded)


Scanned with OKEN Scanner

International Multidisciplinary Online Research Journal

**Approved By UGC Journal No-41129**

**Volume –II, February, 2019**

# SCHOLARS IMPACT

**QUARTERLY**

An Internationally Indexed, Refereed, Peer Reviewed, Quarterly Online and Open Access Journal

**IMPACT FACTOR- 5.98**

## SPECIAL ISSUE

**ON**

# "THE PRESENT SCENARIO OF INDIAN DEMOCRATIC SYSTEM: CHALLENGES AND OPPORTUNITIES"

*EDITOR IN CHIEF*

**DR. M. RAGHIB DESHMUKH**

**www.scholarsimpact.com**

# CONTENTS



| Sr. No. | Research Papers | Page No. |
|---|---|---|
| 1. | "दहशतवाद" भारतीय लोकशाहीला धोका<br>डॉ. एन. झेड. पाटील | 1- 3 |
| 2. | जात प्रभुत्व व महाराष्ट्रातील सत्ताकारण<br>डॉ. पंजाब चव्हाण, प्रा. ए. बी. जाधव | 4 – 6 |
| 3. | भारतीय लोकशाही आणि भ्रष्टाचार<br>डॉ. बी. के. शिंदे | 7 – 11 |
| 4. | भारतीय लोकशाही आणि प्रसारमाध्यमे<br>डॉ. रामानंद बापुराव व्यवहारे | 12 – 17 |
| 5. | भारतीय लोकशाही आणि महिलांचा राजकीय सहभाग<br>प्रा. डॉ. कविता गंगाधरराव सोनकांबळे | 18 – 22 |
| 6. | भारतीय लोकशाही आणि विरोधी पक्षाची भुमिका<br>प्रा. डॉ. सुरेश भालेराव | 23 – 25 |
| 7. | आघाडयांच्या राजकारणाचा भारतीय संघव्यवस्थेवर होणारा प्रभाव<br>Dr. S. B. Phad | 26 – 31 |
| 8. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अपेक्षीत लोकशाही व लोकशाही यशस्वी करण्यासाठी आवश्यक तत्वे : एक अभ्यास<br>प्रा. डॉ. शामसुंदर वाघमारे | 32 – 36 |
| 9. | भारतीय संविधानातील मूल्यविचार<br>डॉ. कल्याण गोलेकर | 37 – 39 |
| 10. | भारतीय लोकशाही आणि मानवाधिकार : एक अभ्यास<br>प्रा. डॉ. खान इकबाल गफ्फार | 40 – 41 |





Scanned with OKEN Scanner

9

# भारतीय संविधानातील मूल्यविचार

Lala Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

डॉ. कल्याण गोलेकर
कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय,
सोनपेठ, जि. परभणी
Email: kmgolekar@gmail.com

## प्रस्तावना

भारतीय संविधानातील मूल्यविचार पहाण्यापूर्वी भारतीय शासन व्यवस्थेचे प्राचीन, मध्ययुगीन, ब्रिटीशकालीन स्वरूप पहाणे आवश्यक ठरते. नंतरच स्वतंत्र भारताने कोणत्या शासन मूल्यांचा स्वीकार करून भारतीय संविधानाचा स्वीकार केला, हे अभ्यासने आवश्यक ठरते. भारतातील प्राचीन, मध्ययुगीन आणि ब्रिटीशकालीन शासन व्यवस्थांमध्ये सर्रासपणे धर्म, जात, पंथ, उच्चनिचता, भ्रष्टाचार यांचा मुक्त वापर झाल्याचे आढळून येते. अशा सर्व अनुभवातून स्वतंत्र भारताचे संविधान कसे असावे आणि त्यात कोणत्या कोणत्या सामाजिक, राजकीय आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक मूल्यांचा स्वीकार करावा हे प्रमुख आव्हान भारतीय संविधान निर्मात्यांसमोर होते. अशा सर्व परिस्थितीतून भारतीय घटनाकारांनी जगातील अनेक राज्यघटनांचा अभ्यास करून, कांही ब्रिटीश कायद्यातील तरतुदींचा स्वीकार करून, कांही ऊरी बाळगलेली स्वप्ने, ध्येय, धोरणे यांचा स्वीकार करत भारताच्या संविधानास मूल्यात्मक स्वरूप प्राप्त करून दिले.

समाजात विविध स्वरूपाची मूल्य असतात. जेव्हा मानवाची कृती ही समाजहिताला उपयोगी ठरणारी असते, तेंव्हा त्यास मूल्य असे म्हणतात. ज्या तत्त्वांमुळे समाजाचे भले होते त्या तत्त्वांना मूल्य म्हटले जाते. जशी सामाजिक स्वरूपाची कांही मूल्य असतात तशीच कांही राजकीय स्वरूपाची देखील मूल्य असतात. त्यांचा स्वीकार एकतर संविधानात केला जातो किंवा ती रूढी, परंपरा, संकेत याद्वारे पाळले जातात जसे की इंग्लंडची राज्यघटना.

भारतीय संविधानाची सुरूवातच मूल्यविचारांनी झालेली आहे. संविधानाच्या सुरूवातीलाच जी उद्‌देशपत्रिका जोडण्यात आली आहे ही उद्‌देशपत्रिका म्हणजे जणूकांही राजकीय मूल्यांचा खजिनाच आहे. ही उद्‌देशपत्रिका भारतीय संविधानाचा कायदेशीर भाग नसला तरी जेंव्हा जेंव्हा घटनात्मक पेचप्रसंग निर्माण होतो तेंव्हा तेंव्हा या उद्‌देशपत्रिकेचा आधार घेवून भारतीय संविधानकर्त्यांना काय अपेक्षित होते हे तपासले जाते. म्हणूनच या उद्‌देशपत्रिकेस संविधानाची किल्ली समजले जाते. या उद्‌देशपत्रिकेची सुरूवात "आम्ही भारतीय लोक" या मूल्यानेच झाली आहे. घटनाकारांनी भारतीय घटना लिहिण्यचे श्रेय भारतीय जनतेला दिले आहे. याद्वारे भारतीय संविधानाचे उगमस्थान भारतीय जनता असल्याचे आढळून येते. पुढील मूल्य भारताने कोणत्या राजकीय व्यवस्थेचा स्वीकार केला आहे हे दर्शविणारे आहेत. भारताची राजकीय व्यवस्था सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्यात्मक रहाणार आहे यातील समाजवादी व धर्मनिरपेक्ष ही मूल्य 42 व्या घटनादुरूस्तीने 1976 स्वीकारण्यात आली आहेत. यातील 'समाजवादी' हे मूल्य कालबाह्य ठरले आहे. म्हणून तो भाग उद्‌देशपत्रिकेतून वगळून टाकावा अशी जनहित याचिकाही सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. परंतु ती फेटाळण्यात आली. वास्तवात ज्या कॉंग्रेस पक्षाने या तत्त्वाचा स्वीकार केला होता, त्यांच्याच सत्ताकाळात भारताला जागतिकीकरणाचा स्वीकार करावा लागला होता. म्हणूनच कॉंग्रेसचे जेश्ठ नेते बॅ. गाडगीळ म्हणत की, कॉंग्रेसने आता समाजवादी आणि धर्मनिरपेक्षता या दोन शब्दांचा वापर करणे सोडून द्यावा. याचाच अर्थ खा.ऊ.जा. धोरणामुळे समाजवादी मूल्य कालबाह्य ठरले आहे. परंतू त्यांचे महत्त्व आजही नाकारता येत नाही. पुढील भागात राजकीय व्यवस्थेची कोणती उद्‌दिष्टये असतील यासंबंधीची शब्दरचना केली आहे. सामाजिक न्यायाच्या मूल्याचा स्वीकार करताना तो न्याय सामाजिक न्याय, आर्थिक न्याय, राजकीय न्याय या स्वरूपात स्वीकारला आहे. स्वातंत्र्य या मूल्याचा स्वीकार करताना व्यक्तिला विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व उपासना याचे स्वातंत्र्य दिलें आहे.



Scanned with OKEN Scanner

समानता या मूल्यांचा स्वीकार करताना दर्जाची व संधीची समानता यांचा स्वीकार केला आहे. व्यक्तिच्या प्रतिश्ठेबरोबरच राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांच्या बरोबरच बंधुत्वासारखे मूल्यही स्वीकारले आहे. या उद्देशपत्रिकेतील शब्दरचना ही अद्वितीय स्वरूपाची आहे. संपूर्ण भारतीय राजकीय संविधानाचे सार त्यामध्ये सामावलेले आहे.

घटनेच्या भाग तीनमध्ये कलम 12 ते 35 मध्ये सहा मूलभूत अधिकारांचा समावेश करण्यात आला आहे. हे सर्व राजकीय मूल्य असून ती स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुत्व प्रस्थापित करण्याबरोबरच संपूर्ण लोकशाही व्यवस्था टिकवून ठेवण्याचे कार्य करीत आहेत. कलम 19 जे की व्यक्ती स्वातंत्र्याबाबत आहे. यामध्ये एकूण सहा मूल्यांचा स्वीकार करण्यात आला आहे. उदा. भाशण स्वातंत्र्य, शांततापूर्वक विना शस्त्र एकत्र जमण्याचे स्वातंत्र्य, संस्था किंवा संघ स्थापन करणे. भारतात मूक्तपणे संचार स्वातंत्र्य, कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य, भारतात कोठेही स्थायिक होण्याचे स्वातंत्र्य ही मूल्य स्वीकारण्यात आली आहेत. वरील सहा मूलभूत अधिकारांबरोबरच घटनेने काही मार्गदर्शक तत्वांचा देखील स्वीकार केला आहे. त्याचे स्वरूप पहाता ते सामाजिक, आर्थिक, राजकीय, गांधीवादी, न्यायविषयक, आंतरराष्ट्रीय आढळून येते यांचा समावेश घटनेच्या भाग चारमध्ये कलम 36 ते 51 मध्ये करण्यात आला आहे. यानंतर 51 (अ) मध्ये एकूण 11 मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला आहे. या मूल्यांचे पालन न केल्यास व्यक्ती, नागरिक शिक्षेस पात्र ठरतात.

वरील सर्व मूल्यांखेरीज काही राजकीय संस्थांचा, पदांचा समावेश देखील घटनात्मक मूल्यांमध्ये होतो. भारतीय संसद, कार्यपालिका, न्यायपालिका, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, लोकसभा सभापती, सरन्यायाधिश इ.

काही राजकीय मूल्यांचे उल्लंघन झाल्यास न्यायालयात दाद मागता येते. उदा. मूलभूत अधिकार. तर मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी झाली नाही म्हणून न्यायालयात दाद मागता येत नाही याचाच अर्थ असा होतो, की कांही मूल्यांना न्यायालयाचे संरक्षण आहे तर काही मूल्य अंमलात आणली नाहीत म्हणून न्यायालयात दाद मागता येत नाही. पण कल्याणकारी राज्याच्या स्वीकारामुळे ती मूल्य राबविण्यासाठी शासनावर जनतेचा व न्यायालयाचा सतत दबाव असतो. उदा. सन 1973 मध्ये सर्वोच्च न्यायालयाने घटनेची मूलभूत चौकट या संकल्पनेची निर्मिती केशवानंद भारती विरूध्द केरळ सरकार या खटल्यात करून त्या चौकटीतील तरतुदी विरूध्द सरकारला बदल करता येणार नाही असे न्या. शिक्री यांनी स्पष्ट केले. उदा. 1) राज्यघटानेची सर्वोच्चता, 2) भारतीय राज्यव्यवस्थेचे प्रजासत्ताक लोकशाही स्वरूप, 3) राज्यघटनेचे धर्मनिरपेक्ष तत्व, 4) अधिकार सत्तेची विभागी, 5) राज्यघटनेचे संघराज्यात्मक स्वरूप, 6) व्यक्तीचे स्वातंत्र्य व प्रतिश्ठा इ. काळाच्या ओघात ही यादी वाढत जाऊन ती 1) घटनेची सर्वोच्चता, 2) भारताचे सार्वभौमत्व, 3) देशाचे ऐक्य, 4) लोकशाही जीवनपध्दती, 5) प्रजासत्ताक राज्यपध्दती, 6) उद्देशपत्रिकेत आणि तिसऱ्या भागातील मूलभूत अधिकार व त्यांची हमी, 7) धर्मनिरपेक्षता, 8) स्वतंत्र न्यायपालिका, 9) केंद्र राज्य अधिकार विभागणी, 10) कायदेमंडळ,कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ यांच्यातील सत्तासमतोल, 11) संसदीय शासनपध्दती, 12) घटनादुरूस्ती विशेश पध्दती अशी व्यापक बनली. एवढेच नाहीतर ही यादी काळाच्या ओघात वाढू शकते असा इशारा 13 न्यायमूर्तींच्या घटनापीठाने दिला आहे. त्यामुळे घटनात्मक मूल्यांची पायमल्ली सहजा सहजी कोणालाही करता येणार नाही हेच स्पष्ट होते. या निकालावर संसदेत खूप टीका झाली. हा निकाल अनेक राजकीय नेत्यांना रूचला नाही. या निकालाचा पूनर्विचार करण्यासाठी पुन्हा एक न्यायपीठही तयार केले होते. पण ते पुन्हा विसर्जित करण्यातही आले. 42 व्या घटनादुरूस्तीने घटनात्मक अनेक मूल्य पायदळी तुडविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. मात्र 43 व 44 व्या घटना दुरूस्तीने आणि 1980 च्या मिनर्व्हा मिल्सच्या खटल्याच्या माध्यमातून 42 वी घटनादुरूस्ती पुर्णपणे रद्द ठरवत न्यायालयाने घटनात्मक चौकटीस, मूल्यांना महत्व प्राप्त करून दिले. म्हणजेच काळाच्या ओघात कांही मूल्य निर्माण होतात यापैकी काही शाश्वत राहतात तर काही कालबाह्य होतात.

सारांश

जगातील सर्वात जुनी संसदीय शासनप्रणाली इंग्लंडची असली तरी जगातील सर्वात मोठया लोकशाहीचे नेतृत्व करण्याची संधी भारताला प्राप्त झाली आहे. संसदीय लोकशाही शासन प्रकार हा एक जीवन प्रकार आहे, जीवनप्रणाली आहे. ते एक लोकशाही राजकीय मुल्य आहे. ती सदा सर्वदा टिकवून ठेवायची असेल, तर घटनात्मक मूल्यांचा स्वीकार करून त्यांचे पालन केले पाहिजे. घटना लिहिण्याचे श्रेय घटनाकारांनी भारतीय जनतेला दिले असले आणि ही राज्यघटना भारतीय जनतेला मान्य असली तरी तिला आव्हान देणाऱ्या घटना भारतात नेहमीच



Scanned with OKEN Scanner

घडत असतात, घडत आहेत. हा प्रकार म्हणजे घटनात्मक मूल्यांना एक आव्हान आहे. म्हणून घटनात्मक मूल्य अबाधित ठेवावयाची असतील तर सजग आणि जागृत समाज असणे आवश्यक आहे.

संदर्भ

1 डॉ. ज. रा. शिंदे, प्रस्तावित पायाभूत अभ्यासक्रम, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद 1999
2 डॉ. ना. य. डोळे, पायाभूत अभ्यासक्रम, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद जून 1999
3 शौरी अरूण, द पार्लामेंटरी सिस्टीम, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे 2010
4 पाटील शिवाजी, मासिक प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी 2007
5 भारताचे संविधान, संचालक, मुद्रण व लेखन सामुग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रीत व प्रकाशित.

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani



Scanned with OKEN Scanner